स्थापना 2005
अनामप्रेम
दिव्यांग हिताय, नित्य समर्पण




# अनामप्रेम स्नेहवार्ता

**अनामप्रेम - मासिक वृत्तपत्रिका APRIL - 2026**

Scanned with OKEN Scanner






अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ‘हेड माऊसवेअर’ उपकरणाचे प्रभावी सादरीकरण पार पडले. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना केवळ डोक्याच्या हालचालींनी संगणक हाताळणे शक्य होणार असून त्यांच्या स्वावलंबनाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांमध्ये नव्या उमेद व आत्मविश्वासाची ज्योत प्रज्वलित झाली.








अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात Youth 4 Job अंतर्गत ‘निओ मोशन वाहन वितरण कार्यक्रम’ उत्साहात पार पडला. या उपक्रमातून ८ विशेष वाहनांचे वितरण करून दिव्यांग लाभार्थ्यांच्या स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाने केवळ वाहनेच नाही, तर लाभार्थ्यांना नव्या आयुष्याची गती, आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची नवी दिशा दिली. दैनंदिन जीवन अधिक सुलभ करत, समाजात सक्षमपणे उभे राहण्याची प्रेरणा देणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने परिवर्तनाची वाट उजळणारा ठरला.




Scanned with OKEN Scanner

नवा मराठा

epaper.enavamaratha.com
23 Apr 2026 - Page 4

# अनामप्रेम हिंमतभवनात दिव्यांगांसाठी हेल्पलाइनचा शुभारंभ

## ‘प्रकाशवाटा’ व एमएस–सीआयटी उपक्रमांचे लोकार्पण



गांधी मैदानावरील अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन प्रकल्पात अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ‘प्रकाशवाटा’ या ब्रेल मासिकाचे लोकार्पण झाले.

नगर – अहिल्यानगरच्या पावन भूमीत, गांधी मैदानावरील अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन प्रकल्पात अक्षय तृतीयेच्यामुहूर्तावर एक नवे, प्रेरणादायी पर्व उजाडले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित असलेल्या या संस्थेने ‘प्रकाशवाटा’ या ब्रेल मासिकाचे लोकार्पण, दिव्यांगांसाठी समर्पित हेल्पलाइनची सुरुवात आणि संगणक साक्षरतेकडे नेणाऱ्या एम एस–सीआयटी कोर्सचा शुभारंभ अशा तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचे उद्घाटन उत्साहात साजरे केले.

कार्यक्रमाची सुरुवात मानवतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या लुईस ब्रेल, अदम्य जिद्दीचे प्रतीक हेलन केलर, तसेच समाजसेवेचे जीवनमंत्र जगणारे डॉ. बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी सभागृहात एक स्फूर्तिदायी वातावरण निर्माण झाले होते. अनामप्रेम प्रकाशगान संगीत रजनी मंचच्या कलाकारांनी सादर केलेल्या सुरेल स्वागतगीताने कार्यक्रमाला भावस्पर्शी सुरुवात मिळाली.

संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने, डॉ. मेघना मराठे आणि अभय रायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अधिकच उजळून निघाला. कार्यकर्ते, विद्यार्थी आणि लाभार्थी यांच्या सहभागाने कार्यक्रमाला जिवंतपणा लाभला.

आपल्या मनोगतात डॉ. मेघना मराठे यांनी ‘प्रकाशवाटा’ या मासिकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या वेगवान व स्पर्धात्मक युगात नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने साकारलेले हे ब्रेल मासिक दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचा दीपस्तंभ ठरणार आहे. विद्यार्थ्यांनी या माध्यमातून स्वतःला घडवून उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करावी, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

इंजि. अजित माने यांनी हेल्पलाइन उपक्रमाविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, ९०११९ ४६८६८ ही हेल्पलाइन सेवा दिव्यांग बांधवांसाठी आशेचा किरण ठरणार आहे. रोजगार मार्गदर्शन, शिक्षण व प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा तयारी तसेच वैयक्तिक अडचणींवर समुपदेशन या सर्व सुविधा एका छताखाली उपलब्ध होणार आहेत. समुपदेशक श्रीमती दीप्तीताई सोंदे व सौ. संगीता सुसर या त्यांच्या प्रभावशाली शैलीत समुपदेशनाचे काम करणार आहेत. यासोबतच ‘प्रकाशवाटा’ मासिकाचा लाभ घ्यावा आणि एमएस–सीआयटी कोर्सद्वारे संगणक साक्षरतेकडे वाटचाल करावी, असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी या हेल्पलाइनवर आलेल्या एका दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समस्येचे निराकरण देखील त्वरित करण्यात आले.

कार्यक्रमात वसतिगृहातील विद्यार्थी परमेश्वर सुपेकर आणि द्वारका जोरवर यांनी ‘प्रकाशवाटा’ मासिकाचे प्रभावी वाचन सादर करून उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांच्या आवाजातून उमटलेले शब्द जणू प्रत्येकाच्या अंतःकरणाला स्पर्श करून गेले. तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते एमएस–सीआयटी कोर्सचे नारळ वाढवून उद्घाटन करण्यात आले, ही क्षणचित्रे सर्वांसाठी अविस्मरणीय ठरली.

या यशस्वी कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यकर्ते प्रकाश गजे, विशाल निंबाळकर, माधवी सैंदाणे, कल्पना कदम, अमृत भुसारी आणि सचिन गारदे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थी अविनाश कोळेकर यांच्या मनोगतपूर्ण आभार प्रदर्शनाने झाला.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आयुष्यात स्वावलंबनाची नवी उमेद जागवणारा, आधुनिक शिक्षणाची दिशा दाखवणारा आणि आत्मविश्वासाची ज्योत प्रज्वलित करणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. अनामप्रेम संस्थेने आज पुन्हा एकदा सिद्ध केले की, जिद्द, संवेदना आणि योग्य दिशा मिळाल्यास कोणतीही वाट अडथळ्यांची राहत नाही–ती ‘प्रकाशवाटा’ बनते.









Scanned with OKEN Scanner

समाचार

## सुनील सकट दाम्पत्याचा सामाजिक उपक्रम

# ‘अनामप्रेम’मधील दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्न-धान्याची भेट

**समाचार/नगर-दि. २७**

स्नेहालय संचलित अनामप्रेम संस्थेत महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट व सौ. वंदना सुनिल सकट यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अन्न-धान्याची भेट देत सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून त्यांच्याशी संवाद साधत त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमावेळी संस्थेचे प्रतिनिधी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या उपकमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले, समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. यावेळी बोलताना सुनिल सकट म्हणाले की,समाजात अनेक घटक असे आहेत जे मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करत आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहकार्य करणे ही केवळ मदत नसून आपली सामाजिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वाआस मिळतो आणि त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. भविष्यातही अशा सामाजिक कार्यात सातत्य ठेवणार असून अधिकाधिक लोकांनी या कार्यात सहभागी व्हावे, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

वंदना सकट म्हणाल्या की, दिव्यांग विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक मदतीची नाही, तर प्रेम, आपुलकी आणि मानसिक आधाराचीही गरज असते. त्यांच्यात अपार क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास तेही समाजात मोठे यश संपादन करू शकतात. अशा उपक्रमांतून आपण त्यांना थोडासा आधार देऊ शकतो, हिच आमची भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

**दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा उपक्रम अनामप्रेम, गांधी मैदान येथे उत्साहात संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले.**

**जीवन आनंद संस्था चे संस्थापक संदीप परब यांनी आपल्या परिवारासह अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी दिव्यांग बांधवांसाठी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास व रोजगार निर्मितीच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली. संस्थेच्या कार्याचे त्यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**





Scanned with OKEN Scanner

www.anamprem.org








अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पासाठी नोबेल फाउंडेशनच्या वतीने डॉ. बापूसाहेब कांडेकर साहेब यांनी 250 लिटर प्रतितास क्षमता असलेली आधुनिक RO सिस्टीम भेट दिली. यामुळे संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्यास मोठा लाभ मिळणार आहे. या प्रसंगी CEO श्री आनंद भंडारी, पद्मश्री पोपटराव पवार, श्री हिरे सर, डॉ. डौले, श्री भास्कर पाटील तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

अहमदनगर घडामोडी

## आरोग्य-सामाजिक संस्थांच्या सहकार्याने सेवा तळागाळापर्यंत: डॉ. स्वानंद सोनार

### जिल्ह्यातील ६८ स्वयंसेवी संस्था, रुग्णालय प्रतिनिधींची बैठक; 'निरामय अहिल्यानगर अभियान' वर चर्चा

दै. अहमदनगर घडामोडी

अहिल्यानगर । प्रतिनिधी –

जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये व स्वयंसेवी संघटनांनी एकत्रितपणे कार्य केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचू शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ. स्वानंद अरुण सोनार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील समन्वयासाठी आयोजित मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनीही या अभियानाची माहिती जाणून घेतली. यावेळी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उत्तर महाराष्ट्र विभागीय समन्वयक डॉ. अजित विसपुते, राज्य समन्वयक युवराज महाजन, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक अजय काळे, लिपिक स्वप्नील कच्छवे, जिल्हा समन्वयक महेश सोलाट तसेच जिल्ह्यातील ६८ स्वयंसेवी संस्था व प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. सोनार म्हणाले, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष सर्व उपक्रमांना आवश्यक समन्वय व सहकार्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. वैद्यकीय सेवांमधील तोतयागिरी अथवा अनुचित प्रकारांबद्दल कारवाईचे कडक निर्देश त्यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत गेल्या वर्षभरात पुरवलेल्या सेवा, विशेष उपक्रम व वितरित निधी यासंदर्भात संक्षिप्त आढावा देण्यात आला.

जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी दरमहा सामुदायिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन रुग्णालयांनी करावे. त्यात सेवाभावी संस्थांनी व्यापक स्वरूपात सहभागी व्हावे. कर्करोग व मुख आरोग्य तपासणीचे प्रमाण वाढवण्यासाठी फिरत्या चिकित्सा पथकांचा वापर वाढवावा, असेही त्यांनी आवाहन केले.

जिल्ह्यातील क्षयरोगग्रस्त रुग्णांच्या पार्श्वभूमीवर विशेष प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव दीप फाउंडेशन व विविध संस्थांच्या वतीने मांडण्यात आला. क्षयरोगग्रस्तांसाठी पोषण व आहार पुरवठ्यासाठी काही संस्था इच्छुक असल्याने नाबार्डचे सहाय्यक महाप्रबंधक विक्रम पठारे यांनी हा प्रस्ताव तत्वत: मान्य केला. प्रशासन, रुग्णालये व स्वयंसेवी संस्थांनी मिळून वाढत्या मानसिक आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही नमूद करण्यात आले.

महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण धोरण निश्चित करण्यात आले. महिला सक्षमीकरण, पोषण व आरोग्य जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत चर्चा झाली. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या आरोग्य समस्यांचा विचार करून त्यांच्यासाठी शुश्रूषा सेवा व निवारा केंद्रे स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला. या घटकांसाठी विशेष आरोग्य सुविधा निर्माण करण्यावर सर्व प्रतिनिधींनी एकमत दर्शवले.

बैठकीदरम्यान ‘निरामय अहिल्यानगर अभियान’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सादरीकरण व सविस्तर चर्चा करण्यात आली. या अभियानांतर्गत सर्वसमावेशक व आजार-प्रतिबंधक आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यावर तज्ज्ञांनी मते व्यक्त केली. जिल्ह्याचा आरोग्य निर्देशांक उंचावण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण आरोग्याबाबत सविस्तर चर्चा झाली. सदर उपक्रमासाठी इंडो आयरिश हॉस्पिटल, मॅक केअर हॉस्पिटल, पंडित हॉस्पिटल, बूथ हॉस्पिटल, गरुड कॅन्सर हॉस्पिटल यांनी मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी तयारी दर्शवली. तसेच नाबार्ड, दीप फाउंडेशन, आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन, प्रथम फाउंडेशन, कृष्णाली फाउंडेशन, सीआरएचपी फाउंडेशन, जामखेड, सीएसआरडी, बॉस्को ग्रामीण विकास केंद्र या सामाजिक संस्थांनीही विविध स्वरूपात सेवा देण्याचा मानस व्यक्त केला.

या बैठकीबाबत ॲड. प्रियंका बोबडे-शेळके, मंदा पोळ, निर्मला केदारी, प्रदीप बांगर, राजेंद्र पवार, साबळे, गायकवाड, जयेश कांबळे, आंगळे यांनी आपापली मते मांडून समाधान व्यक्त केले व निरामय अहिल्यानगर उपक्रम यशस्वी करण्याचा मानस व्यक्त केला.





Scanned with OKEN Scanner

# पाहुण्यांच्या संस्था भेटी



**Pravara Medical Trust संचलित Pravara Medical College येथील नर्सिंग विद्यार्थ्यांनी संस्थेच्या विविध प्रकल्पांना भेट देत सामाजिक कार्याची प्रत्यक्ष माहिती घेतली.**
**या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी प्रकल्पांची पाहणी करून संस्थेचे उद्दिष्ट, कार्यपद्धती तसेच दिव्यांग, वंचित व गरजू घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली.**
**विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्याबद्दल कौतुक व्यक्त करत सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त केली.**

**जन सेवा ट्रस्ट पदाधिकाऱ्यांची अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट**
**मुंबई येथील जन सेवा ट्रस्ट (ओल्ड एज होम) च्या मान्यवर पदाधिकाऱ्यांनी निंबळक येथील ‘सत्यमेव जयते ग्राम’ प्रकल्पास सदिच्छा भेट दिली.**
**यावेळी अनामप्रेम संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली तसेच प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. संस्थेचे निस्वार्थ सेवाकार्य व शिस्तबद्ध कार्यपद्धती पाहून मान्यवरांनी विशेष समाधान व्यक्त केले.**



**अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास स्नेहालय या मातृसंस्थेतील नव्याने रुजू झालेले सहकारी कार्यकर्ता, मित्रपरिवाराने सदिच्छा भेट दिली.**
**यावेळी आगंतुकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक व कौशल्य विकास उपक्रमांची माहिती देण्यात आली.**








Scanned with OKEN Scanner

अनामप्रेम परिवारास गेल्या अनेक वर्षांपासून प्रेम, विश्वास आणि सहकार्याची साथ देणाऱ्या सर्व देणगीदारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संस्थेच्या वतीने नव्याने तयार करण्यात आलेले स्मृतिचिन्ह (मोमेंटो) प्रदान करण्यात आले.

अनामप्रेमच्या सामाजिक कार्यात त्यांच्या अमूल्य योगदानामुळे अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा आणि आत्मविश्वासाचा प्रकाश निर्माण झाला आहे.

या सन्मानातून संस्थेने त्यांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आदर व ऋणनिर्देश व्यक्त केला.





Scanned with OKEN Scanner



प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचालित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, अहिल्यानगर येथील प्रतिनिधींनी अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास भेट देत संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. यावेळी संस्थेतील मुलांसाठी मोफत कौशल्य प्रशिक्षण तसेच वेल्डिंग, प्लंबिंग व इलेक्ट्रॉनिक्ससारखे रोजगाराभिमुख कोर्सेस सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

उडान संस्थेच्या सौ. पल्लवी धामणे-रेखी यांनी हर्षल हॉल, कर्वे रोड, पुणे येथे आयोजित केलेल्या वस्तू प्रदर्शनामध्ये अनामप्रेमच्या दिव्यांग बांधवांद्वारे निर्मित वस्तूंचा स्टॉल लावण्यात आला होता.

पुणेकरांनी दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या उत्पादनांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत भरघोस खरेदी केली. या माध्यमातून दिव्यांगांच्या कौशल्याला प्रोत्साहन मिळाले तसेच त्यांच्या स्वावलंबनाच्या प्रवासाला बळ मिळाले.










सर्वधर्म समभावाचा सुंदर संदेश देत “या हजरत बाबा गोदडशाह वली दर्गाह” यात्रोत्सवानिमित्त अनामप्रेम ऑर्केस्ट्राच्या दिव्यांग कलाकारांनी आपल्या अप्रतिम कला सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

भक्तिगीते, कव्वाली, आधुनिक गीते व सुरेल सादरीकरणातून दिव्यांग मुलांनी “कला हीच खरी ओळख” असल्याचे पुन्हा सिद्ध केले. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सहभागामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.



Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



**जायंट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर यांची अनामप्रेम प्रकल्पास सदिच्छा भेट..**

**जायंट्स ग्रुपच्या मान्यवर सदस्यांनी अनामप्रेम प्रकल्पास भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी मुलांसाठी १६ उच्च दर्जाच्या Hitlon गाद्या व १६ बेडशीट्स भेट स्वरूपात प्रदान केल्या.**

**संस्थेच्या मराठवाडा प्रकल्पास कु. भगवती संतोष दराडे हिने आपल्या वाढदिवसानिमित्त आई-वडिलांसह अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी किराणा सामग्री अन्नदान स्वरूपात संस्थेस प्रदान केली.**

**विशेष म्हणजे कु.भगवतीने नुकत्याच दहावी परीक्षेत ९०% गुण मिळवत यश संपादन केले असून ती ड्रॉइंग व पेंटिंगमध्येही अत्यंत गुणी आहे. स्वतःच्या पहिल्या कमाईतून वाढदिवसाचा खर्च न करता संस्थेला अन्नदान देण्याचा तिचा सुंदर व प्रेरणादायी उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे.**












**संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात दिनांक २५ एप्रिल रोजी विश्वस्त मंडळाची बैठक संपन्न झाली.**

**बैठकीदरम्यान संस्थेच्या विविध उपक्रमांबाबत तसेच महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करून पुढील नियोजनाची दिशा निश्चित करण्यात आली.**

**या बैठकीस संस्थेचे विश्वस्त व प्रकल्प प्रमुख उपस्थित होते.**



Scanned with OKEN Scanner

# “अपंगत्वावर मात करून आत्मसन्मानाने उभा राहिलेला संघर्षयोद्धा – संतोष फुलसुंदर”



"जखमा शरीरावर असल्या तरी माणूस मनाने हरला, तरच खरा अपंग ठरतो..."
ही ओळ जणू संतोष देवराम फुलसुंदर यांच्या जीवनप्रवासासाठीच लिहिली गेली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात वसलेल्या शेळकेवाडी या छोट्याशा खेड्यात २० डिसेंबर १९७९ रोजी एका गरीब शेतकरी कुटुंबात संतोष यांचा जन्म झाला. आई-वडील दिवसभर कष्ट करून संसाराचा गाडा ओढत होते. साधं, संघर्षमय पण समाधानाचं जीवन सुरू होतं. परंतु नियतीने या चिमुकल्यासाठी वेगळंच काही लिहून ठेवलं होतं.

अवघ्या तीन महिन्यांचा निष्पाप जीव... खेळता खेळता पायाला दिवा लागला आणि एका क्षणात संपूर्ण आयुष्य बदलून गेलं. आगीत भाजलेला पाय, वेदनांनी विव्हळणारं लेकरू आणि असहाय्य आई-वडिलांचे डोळे... सरकारी दवाखान्यांचे उंबरठे झिजले, औषधोपचार झाले, प्रार्थना झाल्या; पण नियतीने घेतलेला निर्णय बदलला नाही. त्या दिवसापासून संतोष यांचा एक पाय कायमचा अपंग झाला.

पण म्हणतात ना...
“देहाला अपंगत्व येऊ शकतं, मनाला नाही.”

संतोष यांनी हेच आपल्या जीवनाचं सूत्र मानलं. गरिबी, अपंगत्व आणि मर्यादित साधनसंपत्ती या तिन्ही संकटांनी त्यांना वेढलं होतं, तरी त्यांनी कधी परिस्थितीपुढे हात टेकले नाहीत. जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण झालं; पण पुढील शिक्षणाचं स्वप्न गरिबीच्या वादळात हरवलं.

त्यांनी आयुष्याला दोष दिला नाही, तर स्वतःला घडवण्याचा मार्ग निवडला.



Scanned with OKEN Scanner



“तुमच्याकडे काय आहे किंवा काय नाही हे महत्त्वाचं नसतं;
तर आहे त्या परिस्थितीत तुम्ही किती खंबीरपणे उभे राहता, हे महत्त्वाचं असतं.”

ही उक्ती जणू त्यांनी जगून दाखवली.

हातात भाजीपाल्याची टोपली घेतली, डोक्यावर कष्टांची जबाबदारी घेतली आणि गावात छोटासा भाजीपाला गाडा सुरू केला. कधी नफा, कधी तोटा; पण प्रामाणिकपणा आणि आत्मसन्मान त्यांनी कधी सोडला नाही.

लोक उपहासाने विचारायचे —
"अपंग माणूस काय करणार?"

ते हसून उत्तर द्यायचे —
“कष्टाला अपंगत्व नसतं.”

सन २००८ मध्ये त्यांच्या आयुष्यात आनंदाची नवी पहाट उगवली. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील उज्वला गायकवाड यांच्याशी त्यांचा विवाह झाला. उज्वला स्वतः दिव्यांग... शाळेत पडल्यामुळे गुडघ्याखालचा पाय गमावलेली. दोन अपंग व्यक्तींचा संसार... पण तो दयेमुळे नव्हे, तर धैर्य, प्रेम आणि परस्पर समजुतीच्या भक्कम पायावर उभा होता.

एकमेकांच्या काठ्या बनून त्यांनी संसाराचा रस्ता चालायला सुरुवात केली. संघर्षाच्या वाटेवर प्रेमाची फुले उमलली आणि दोन कन्यारत्नांच्या आगमनाने त्यांच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरले.

संतोष अनेकदा भावूक होत म्हणतात —
“देवाने खूप काही घेतलं... पण दिलंही मनभरून.”

२०२० मध्ये कोरोना महामारीच्या काळात त्यांच्या आईचे निधन झाले. आईचा मायेचा हात डोक्यावरून निघून गेला; पण तिचे संस्कार आणि जिद्द त्यांच्या पाठीशी कायम उभी राहिली. डोळ्यात अश्रू होते, पण पावलं थांबली नाहीत.

आणि मग... त्यांच्या आयुष्यात अनामप्रेम आलं.



Scanned with OKEN Scanner

सन २०२२ मध्ये अनामप्रेम संस्थेचे कार्यकर्ते अकोले तालुक्यात किराणा किट वितरणासाठी आले होते. त्या कार्यक्रमात संतोष आणि उज्वला दोघेही उपस्थित होते. संस्थेचं दिव्यांगांसाठी चाललेलं कार्य पाहून संतोष भारावून गेले. त्यांच्या मनात एकच विचार आला – "मलाही अशाच संस्थेसाठी काम करायचं आहे."
तेव्हा त्यांनी एक वाक्य उच्चारलं, ज्याने त्यांच्या आयुष्याला नवं वळण दिलं –
"मला मदत नको... मला काम द्या."
ही केवळ विनंती नव्हती; तो त्यांच्या आत्मसन्मानाचा आवाज होता.

आणि त्याच दिवसापासून संतोष यांचा अनामप्रेम परिवारात नवा जन्म झाला.

सुरुवातीला गोठ्यातील काम, नंतर मेंटेनन्स, त्यानंतर सुरक्षारक्षक... प्रत्येक जबाबदारी त्यांनी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि आत्मीयतेने पार पाडली. त्यांच्या कामातील समर्पण पाहून आज त्यांना अनामप्रेमच्या कौशल्य विकास विभागातील "साथी चप्पल उद्योग" मध्ये महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.
आज ते चप्पल विभाग, क्रॉक्स विभाग, सॅनिटरी पॅड विभाग तसेच नॅपकिन बुके विभागात अत्यंत कुशलतेने काम करतात. सॅनिटरी पॅड मशीन ते एखाद्या अनुभवी तंत्रज्ञाप्रमाणे हाताळतात. संस्थेच्या उत्पादनांचे मार्केटिंग करताना त्यांच्या शब्दांत इतकी आत्मीयता असते की ग्राहक फक्त वस्तू विकत घेत नाहीत, तर त्या मागचा संघर्षही अनुभवतात.

संतोष फुलसुंदर हे केवळ कर्मचारी नाहीत; ते अनेक दिव्यांगांसाठी आशेचा दीप आहेत.

त्यांच्या मनोगतात ते म्हणतात –
"मला अनामप्रेम संस्थेचा अभिमान वाटतो. ही संस्था दिव्यांगांना केवळ मदत करत नाही, तर त्यांना स्वतःच्या पायावर उभं राहायला शिकवते. पूर्वी माझा भाजीपाल्याचा व्यवसाय होता; अनेकदा तोटाही व्हायचा. स्थैर्य नव्हतं. पण आज संस्थेमुळे माझ्या आयुष्याला दिशा आणि आधार मिळाला आहे."

आज संतोष अभिमानाने म्हणतात –
"पूर्वी मी भाजीपाला विकत होतो... बऱ्याच वेळा तोट्यात जायचो.
आज मी वस्तू विकत नाही, तर स्वतःला घडवत आहे."

त्यांचा जीवनप्रवास प्रत्येकाला एक गोष्ट शिकवून जातो –

"ज्या पायांनी चालता येत नाही, त्या पायांवरही आयुष्य उभं राहू शकतं...फक्त मन खंबीर असलं पाहिजे."



Scanned with OKEN Scanner

संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.

## संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805




मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199


## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank Of India |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ),<br>Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.



Scanned with OKEN Scanner